नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका व शहर विकास प्राधिकरणे यांच्या क्षेत्रात आणि ग्रामीण भागात "अटल आनंदवन घन वन प्रकल्प" कार्यान्वित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :-साववि-२०१९/प्र.क्र.३/फ-११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१९

प्रस्तावना : -

राज्यातील वनक्षेत्र व वनेतर क्षेत्रावरील वृक्षाच्छादन २० टक्केवरून ३३ टक्केपर्यंत नेण्यासाठी हरित महाराष्ट्र प्रकल्प राबविण्यात येत आहे. राज्यातील ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमातर्गत दि. १ जुलै २०१९ ते ३० सप्टेंबर २०१९ या तीन महिन्यांच्या कालावधीत ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

राज्यातील वृक्षाच्छादन ३३ टक्केपर्यंत नेण्यासाठी, शहरी आणि ग्रामीण भागात प्रदूषणावर मात करुन आरोग्यदायी वातावरण व पर्यावरण निर्मिती करण्यासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम सुरू ठेवावा लागेल.

प्रस्तावित वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम निरंतरपणे पुढे सुरु राहण्यासाठी शहरी आणि काही ठिकाणी ग्रामीण भागात असलेली मोकळया जागांची कमतरता पाहता अन्य पर्याय वापरुन वृक्षाच्छादन वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.

जगामध्ये सर्वच क्षेत्रामध्ये प्रयोगशीलतेतून नवनवीन तंत्राचा विकास होत आहे. उपलब्ध कमी क्षेत्रामध्ये जास्त वृक्षांचे आवरण आणि घन वन (Dense Forest) निर्माण करण्याचा प्रयोग जपानमध्ये श्री.मियावाकी या वनस्पती शास्त्रज्ञाने सुरू केला. भारतामध्ये बंगलोर, हैद्राबाद इ. ठिकाणी हा प्रयोग यशस्वीपणे राबविला आहे. तसेच राज्यात जालना, औरंगाबाद, हिंगोली, बीड, लातूर, पुणे, जळगाव अशा जिल्ह्यांमध्ये विशेषत: वन विभाग तसेच सामाजिक वनीकरणांच्या जागांवर प्रायोगिक तत्वावर गेल्या दोन वर्षांपासून घन-वन वृक्ष लागवड अल्प प्रमाणावर घेण्यात आली आहे. आनंदवन, वरोरा, जिल्हा- चंद्रपूर येथील महारोगी सेवा समितीचे जमिनीवर हा प्रकल्प उत्तमरितीने विकसित केला आहे. सदर बाबी विचारात घेऊन राज्यामध्ये घन-वन प्रकल्प हाती घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलली प्रार्श्वभूमी विचारात घेऊन, मियावाकी घन वन प्रकल्पाची संकल्पना व राज्यातील हवामान, स्थानिक परिस्थिती, पावसाचे प्रमाण, पाण्याची उपलब्धता इत्यादी बाबीं लक्षात घेऊन त्यास अनुरूप घन वन प्रकल्प **"अटल आनंदवन घन वन प्रकल्प"** या नांवे शहरी आणि ग्रामीण भागामध्ये कार्यान्वित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१.० योजनेचा उद्देश :-

१) शहरी भागातील जागेची कमतरता विचारात घेऊन छोटया क्षेत्रात मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड करणे.

२) रोपवनास जैविक पदार्थ, सेंद्रीय खते,पाणी अशा पुरक संसाधनाची जोड देवून कमी कालावधीत रोपांची चांगली व जलद वाढ साधणे, जिवंत रोपांची टक्केवारी जास्तीत जास्त राखणे.

३) शहरी भागात वृक्षराजी वाढवून विविध प्रदूषणांवर नियंत्रण करणे.

२.० <u>"अटल आनंदवन घन वन प्रकल्पाची" अमंलबजावणी</u> :-

राज्यात २०१९ मधील पावसाळ्यापासून वृक्ष लागवडीची सदर संकल्पना राबविण्यात यावी.

१. शहरी भागातील शासकीय मालकीची कार्यालये, विश्रामगृहे, वनक्षेत्र, उद्यानातील विशिष्ट भाग, स्मृती वने, नाना-नानी पार्क व शहरामध्ये उपलब्ध असलेल्या व योग्य अशा कोणत्याही ठिकाणी हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावा.

२. त्याचबरोबर, ग्रामीण भागात ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील शासकीय जागांवर, उत्तमराव पाटील जैवविविधता उद्याने, एम.आय.डी.सी. क्षेत्र, मोठ्या शैक्षणिक संस्थाचा परिसर, लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील भुकंपामुळे बाधित झालेल्या व नंतर पुनर्वसन झालेल्या गावठाणाच्या क्षेत्रावर आणि इतर कोणत्याही योग्य आणि उपलब्ध जागांवर हा प्रकल्प हाती घेता येईल.

३. सदर योजनेसाठी नगरपालिका, नगरपंचायती आणि महानगरपालिका व शहर विकास प्राधिकरणे त्यांच्याकडील रोपवाटिकांमधून रोपांची उपलब्धता करतील.

४. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी मागणी केल्यास आवश्यक असलेली रोपे सामाजिक वनीकरण व वन विभागाच्या रोपवाटिकेमधून वन महोत्सव कालावधीत सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येतील. मात्र वृक्षांच्या स्थानिक प्रजातींचाच वापर करणे बंधनकारक राहील.

५. शहरी भागाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी सामाजिक वनीकरणामार्फत प्रत्येक जिल्हयात उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यानात १० X१० मीटर क्षेत्रात प्रात्याक्षिक क्षेत्र म्हणून सदर प्रकल्प राबविता येईल.

६. ज्या विभागात ही योजना राबविण्यात येईल त्या विभागाचे संबंधित सक्षम अधिकारी सदर प्रकल्पास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देतील.

७. स्थानिक स्वराज्य संस्था, शहर विकास प्राधिकरणे, एमआयडीसी आणि इतर यंत्रणांना सदर प्रकल्प अंमलबजावणीमध्ये तांत्रिक व अन्य सहाय्य तसेच मार्गदर्शन वन विभागामार्फत आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन दिले जाईल.

८. पाण्याचा आश्वासित स्त्रोत उपलब्ध असेल त्या ठिकाणी ही योजना राबविण्यात यावी.

३.० आर्थिक तरतूद: -

या प्रकल्पासाठी खालील स्त्रोतातून निधी वापरता येईल.

१. स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांकडे आणि शहर विकास प्राधिकरणाकडे स्वत:च्या उत्पन्नातून तसेच वृक्ष लागवडीसंबंधातील विविध योजनेतून उपलब्ध होणारा निधी.

२. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.साववि-२०१६/प्र.क्र.८०(भाग-२)/फ-११, दि.२५.०७.२०१८ अन्वये वृक्षारोपण आणि संगोपनासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागांना ०.५ टक्के मर्यादेत उपलब्ध होणारा निधी.

३. सामाजिक दायित्व निधी (CSR Funds).

४. डीपीसी, खाण विकास निधी, आमदार/खासदार निधी आणि अन्य इतर कोणत्याही स्त्रोतातून उपलब्ध होणारा निधी.

४.० सदर प्रकल्प राबविण्यासाठी नमूना अंदाजपत्रकांबाबत स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

५.० सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि.२० जून २०१९ रोजी झालेल्या बैठकीत मिळालेल्या मान्यते नुसार आणि नगर विकास विभागाच्या सहमतीने तसेच नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र ३८/१४७५ दि.०४.०२.२०१९ अन्वये आणि वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. मंमंप्र-१३/ व्यय१० दि. १५.०६.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६.० सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२५१६४९०४७७१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.06.25 16:53:21 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य.
३. मा. मुख्य सचिव.
४. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.
५. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग.
७. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग.
८. प्रधान सचिव (नगर विकास), नगर विकास विभाग.
९. सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव.
१०. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक.
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, नागपूर.
१४. सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक.
१५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१६. सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
१७. सर्व विभागीय आयुक्त (महसूल).
१८. सर्व जिल्हाधिकारी.
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२०. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२१. संचालक, नगर प्रशासन संचालनालय, वरळी , मुंबई.
२२. सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक).
२३. सर्व उप वनसंरक्षक (प्रादेशिक).
२४. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .
२५. सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख.
२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर पंचायत.
२७. सर्व विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)
२८. महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,

२९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई -४०० ०३२.
३१. सर्व महामंडळे / मंडळे, शासकीय उपक्रम.
३२. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई.
३३. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प- ०६ मंत्रालय, मुंबई-३२.
३४. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३५. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३६. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३७. निवडनस्ती/फ-११.

****